दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१२/२०२६.
MHAK110000472026
साळुंकाबाई रंदे व इतर विरुद्ध कोणीही नाही

## निशाणी क्र.१ वरील आदेश.

अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टच्या कलम २ प्रमाणे अर्ज दाखल करुन वारस प्रमाणपत्र मिळण्याची विनंती केली आहे.

२. अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील नामे **मोतीराम गणपत रंदे** यांचे दि.२२.०३.२०२४ रोजी मौजे हिवरखेड, ता. तेल्हारा, जि. अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मोतीराम यांचे आई–वडील गणपत बापुना रंदे व सोनाबाई गणपत रंदे यांचे अनुक्रमे दि.१८.०७.१९८० व दि. ०८.०१.२००१ मौजे हिवरखेड, ता. तेल्हारा, जि. अकोला येथे निधन झाले आहे. अर्जदारांव्यतिरिक्त मयत मोतीराम गणपत रंदे यांना इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामाकरिता मोतीराम गणपत रंदे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. सबब, अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. अर्जाचे अवलोकन केले. अर्जदाराने निशाणी क्र. १० वर दाखल केलेल्या मृत्यू नोंदणीच्या नोंदवही उता–यावरुन मोतीराम गणपत रंदे यांचे दि.२२.०३.२०२४ रोजी निधन झाल्याचे दिसून येते. अर्जदाराच्या अर्जातील मागणीबाबत हरकती मागविण्यासाठी यांनी 'दैनिक सायरन' अकोला दि.१४.०१.२०२६ या वृत्तपत्रात जाहिर नोटीस/समन्स प्रकाशित करुन हरकत असल्यास प्रकरणात हजर होण्यास कळवले होते. परंतु अर्जास कोणीही हरकत घेतली नाही.

४. अर्जातील कथनांच्या अनुषंगाने अर्जदार क्र.२ राजेंद्र मोतीराम रंदे यांनी निशाणी क्र.९ वर शपथपत्र दाखल केले व सर्व अर्जदार हे मोतीराम गणपत रंदे यांचे कायदेशिर वारस असल्याचे कथन केले आहे.

५. अर्जातील कथनांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, अर्जदारांनी ते

मयत मोतीराम गणपत रंदे यांचे वारस असल्याचे कथन केलेले आहे. सदर कथन हे अर्जदारांनी शपथपत्रासोबत दिलेले आहे. अर्जदारांच्या मागणीबाबत कोणीही हरकत घेतलेली नाही. सबब, अर्जदार हे मयत मोतीराम गणपत रंदे यांचे वारस असल्याचे दिसुन येते. अर्जदारांच्या कथनानुसार शासकीय कामाकरिता त्यांना मोतीराम गणपत रंदे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतच्या प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टच्या कलम २ प्रमाणे वारसांच्या आवश्यकतेसाठी वारस प्रमाणपत्र देता येते. सदर मागणी विचारात घेताना अर्जदार हे मयत व्यक्तीचे वारस आहेत का, केवळ हे विचारात घेणे आवश्यक आहे व वारसांच्या मागणीप्रमाणे सदर वारस प्रमाणपत्र देता येते. सबब, अर्जदार हे मयत मोतीराम गणपत रंदे यांचे वारस असल्याचे दिसुन येत असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत **मोतीराम गणपत रंदे** यांचे वारस असल्याने योग्य ते शुल्क आकारुन त्यांना तसे वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

RAHUL KESHAV DESHPANDE

Digitally signed by RAHUL KESHAV DESHPANDE
Date: 2026.03.14 14:17:44 +0530

दिनांक– १३.०३.२०२६ (आर. के. देशपांडे)

तेल्हारा दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, तेल्हारा.

Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original.

| | |
|---|---|
| Name of Stenographer | : S. M. Jagtap |
| Court Name | : R.K. Deshpande, C.J.J.D.& J.M.F.C, Telhara |
| Date | : 13.03.2026. |
| Signed by presiding officer on | : 13.03.2026. |
| Uploaded on | : 14.03.2026. |